# प्रकरण दुसरे

## " धग " या कादंबरीत चित्रित झालेले समाजजीवन

प्रास्ताविक

" धग " या कादंबरीत चित्रित झालेल्या समाजजीवनाचे चित्रण याचा अभ्यास व विश्लेषण हा या प्रकरणाचा हेतू आहे.

उद्धव ज. शेळके यांची " धग " ( १९६० ) ही मराठी ग्रामीण कादंबरी कादंबरीरचनेचे रूढ संकेत झुगारून मैलाचा दगड ठरली. या कादंबरीत विदर्भाचे ग्रामीण अस्सल जीवन वास्तवतापूर्ण पध्दतीने चित्रित झालेले आहे. कौतिक तिच्या भोवतालची सर्व माणसे यांच्यामधील परस्परसंबंध " धग " मध्ये चित्रित होतात. कौतिक ही या कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. विदर्भाच्या समाजजीवनातील सुख दुःखाचे दर्शन " धग " या प्रादेशिक ग्रामीण कादंबरीत प्रतितिसुंदर झालेले आहेत.

" धग " या कादंबरीत कौतिक या शिंपी कुटुंबातल्या सामान्य स्त्रीने जगण्या साठी केलेल्या धडपडीची कथा आहे. कादंबरीतील घटना-प्रसंग कुठल्याही अर्थाने अघटित वाटावेत असे नाहीत. नेहमीचे साधे प्रसंग. परंतु त्यांना व्यापक परिमाण लाभले आहे. जगण्याच्या प्राथमिक प्रश्नाने तिचे आणि तिच्या कुटुंबाचे जीवन एवढे गुरफटून टाकले आहे की, शेवटपर्यन्त कौतिक त्यातून बाहेर पडत नाही. विपरित

परिस्थितीत राब-राबून पै-पैसा जमा करून गणपत कलालकडे ठेवलेली मशिन ती सोडवून आणते. डोक्यावर घेतलेले मशिनचे पायदान मध्यरस्त्यावर जमिनीवर निसटून पडते. पाषाणाचे तुकडे होतात अगदी तसेच तिच्या परिस्थिती विरुध्दच्या एकाकी लढयात तिच्या इच्छा-अंकांक्षांचे तुकडे झालेले आहेत. आपल्या साध्यासुध्या इच्छा घेऊन ही माणसं जगू पहात आहेत. पण आयुष्य मात्र निर्दय कठोरतेने त्यांना ठाम नकार देत राहाते.

माणसा माणसांतील परस्पर संबंधाचे स्वरुप यातून होणारे समाजजीवन दर्शन घडते. " धग " या कादंबरीचे सामर्थ्य शेळक्यांनी चित्रित केलेल्या समाजचित्रणात आहे. ते समाजचित्रण हादरवून टाकते आणि अस्वस्थ करते.

प्रथम आपण साहित्य वसमाजजीवन यांचा संबंध स्पष्ट करून नंतर " धग " या कादंबरीत चित्रित झालेले समाज-जीवन अभ्यासू.

साहित्य व समाजजीवन

ज्या सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्टयपूर्ण पर्यावरणा-मध्ये व्यक्तिमन जन्मते. त्या व्यक्तिमनाला आकार देण्याचे काम हे विशिष्ट सामाजिक पर्यावरणाच करते. केवढाही

12718
A

मोठा प्रतिभावंत असला तरी सामाजिकतेच्या प्रभावापरिणामाखालीच त्याचे मन, बुद्धी, प्रतिभा, विचारसंवेदना आकारत असतात. त्या व्यक्ति आणि समष्टी यांच्या अभेद्य संबंधाबाबत कुसमावती देशपांडे लिहितात, " मानवी अंतर्मनाच्या प्रवृत्ती, मनाच्या वेगवेगळया थरांतील संघर्ष अत्यंत चित्तवेधक असतात खरे. परंतु अखेर त्यापैकी ब-याच प्रवृत्ती, भोवतालच्या समाजरचनेचे, एकंदर परिस्थितीने निर्माण केलेल्या असतात. व्यक्तीचे मन व समाजाची रचना यांच्या संबंधाचा विचार करु लागले की, कोंबडी व तिचे अंडे यांच्याविषयीच्या कूटप्रश्नाची आठवण होते" [१] कोणत्याही समाजाच्या साहित्यात त्याची सामाजिकता, संस्कृती प्रतिबिंबित झालेली असते.

भोवतालच्या परिस्थितीची आणि साहित्याचाज अन्योन्य संबंध असतो. तेत एच. ए. यांच्या मते, " कोणतीही साहित्यकृती घेतली तरी, ती केवळ कल्पनांचा खेळ किंवा उद्दीपित मेंदूतून निघालेली एक क्षणिक लहर असत नाही, ती लिहिणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो त्या समाजाचा त्याच्या देशाचा, त्या देशाच्या इतिहास-भूगोल संस्कृतीचा, तो लेखक ज्या काळात जगला त्या कालातील युगधर्माचा एकसमयावच्छेदेकरुन त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो. आणि या सर्व घटकांचे परिशीलन केल्यानंतर त्या कलाकृतीचे सम्यक् दर्शन होऊ शकते" [२]

मानवाचे नानाविध व्यवहार, त्यांची विविध नाती, त्यांचे परस्पर संबंध त्यांच्या इच्छा, आशा, आकांक्षा, सर्वप्रकारच्या भाव-भावनाव व असंख्य मनोव्यापार त्यांच्याकडून घडणा-या कृति-प्रतिकृती तात्पर्य मानवाचा अंतर्बाह्य वैयक्तिक आणि सामाजिक जीवन ही कादंबरीची सामुग्री आहे. या अफाट मानवी जीवनाचे मंथन करुन त्यांच्या तळाशी असलेली सत्ये शोधून काढण्याचे कार्य कादंबरीकार करीत असतो. हे विशाल असे मानवी जीवन ही कादंबरीची सामुग्री आहे. साहित्य आहे असे श्री. मा. कुलकर्णी आपल्या " कादंबरीची रचना" या ग्रंथात म्हणतात.

अस्सल कलाकृतीत तत्कालीन जीवनार्थाची संदर्भ होताव लेखक विशिष्ट अनुभवांच्या माध्यमातून शाश्वसर्व सार्वकालिक जीवनसत्यांचा अविष्कार घडविण्याचा प्रयत्न करतो. माणसामाणसांमधील परस्पर सबंधाचे स्वरुप यातून होणारे समाज जीवनदर्शन घडते. चित्रित झालेले जीवन, चित्रित व्यक्ती व घटना तसेच तत्संबंधी वातावरण हे प्रत्यक्ष वास्तव असतेच असे नाही, पण त्यातून प्रत्यक्ष जीवन नसले तरी जीवनाशी समांतर विश्व चित्रित झालेले असते.

" धग " या कादंबरीत शेळके यांनी एकूणच जगण्यासाठी करावा लागणारा प्राथमिक संघर्ष हेच त्यांच्या कादंबरी विश्वातील माणसांचे जीवन आहे. तळागाळातील माणसाचे वास्तवतापूर्ण जीवन रेखाटलेले आहे. त्या काळचे स्त्री-पुरषांचे

व्यक्तिमत्व, त्यांची प्रकृती, प्रवृत्ती, समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक स्थिती-गती यांचे वास्तव समाजजीवन दर्शन प्रस्तुत कादंबरीत घडते. त्याकाळी विदर्भाच्या प्रादेशिक परिसरात कोणत्या प्रकारचे समाजजीवन होते, ते " धग " च्या कथानकाद्वारे आपण आता अभ्यासू.

" धग " मधील समाजजीवन

" धग " या कादंबरीची सुरवात विदर्भाच्या हिंगणघाट या खेडेगांवात सामान्य जीवन जगणाऱ्या शिंपी कुटुंबाच्या संसार चित्रणातून होते. कादंबरीची मुख्य व्यक्तिरेखा कौतिक आपल्या भावाच्या घरात राहात होती. तिचा नवरा महादेव आणि तिचे दोन मुले भीमा-नामा तसेच तिची आई गोदूबाई, भावजय गंगा आणि तिचा भाऊ गोविंदा ही सारी एकत्र राहात होती.

या शिंपी कुटूंबाचा कपडे शिवण्यांचा धंदा आहे. (धंदा) गोविंदाची कपडे शिवण्याची मशीन असते. विदर्भातील हिंगणघाट, तळेगांव, मोझरी या खेडेगांवातील लोक परंपरागत शेती व्यवसाय करीत होते. बहुतेकांची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे. देश तसा वेश या रूढीप्रमाणे त्या काळी लोक बांडीसा, बारकशा, चोळ्या हाच पेहराव करत असत. त्या काळात सदरे,

बुशशर्टस, झंपर्स लोक वापरत नसत व त्यामुळे ते शिवले जात नव्हते, लोक कोट आणि टोप्यांचा वापर अधिक प्रमाणात करत असत. गि-हाइकांना इस्त्रीची गरज नव्हती. एखांद्यास भासलीच तर कपडा घडी करुन त्यावर वजन ठेवले की, इस्त्री व्हायची. अशी एकूण साधी जीवन-पध्दत त्याकाळी होती.

गोविंदा आणि महादेव हे दोघे मेहूणे जावई एका ठिकाणी राबत असायचे. कौतिकाची आई गोदुबाई ही मिलमध्ये काम करायची. तिला महिन्याला दहा रुपये पगार होता. त्याकाळी स्वस्ताई होती. शिवणाकाम भरपूर होते, त्यामुळे हे शिंपी कुटुंब खाऊन -पिऊन आणि कपडालत्यांनी समृध्द होते. सारे सुरळीत सुरु होते. नामा व भीमा शाळेत जात होते.

समाजजीवनातील एकत्र कुटूंब पध्दतीचे सुरवातीस सुंदर पध्दतीने जीवनचित्रित झालेले आहे. लेखकांने म्हटल्याप्रमाणे एका जागची भांडी न वाजता राहात होती. एकमेकास टकरावत नव्हती असं नाही, पण त्यांचा आवाज जाणवत नव्हता.

हे सरळ जीवन जगणा-या शिंपी परिवारात शक्य तेवढे निष्क्रीय राहून आला दिवस ढकलण्यात समाधान मानणा-या

कौतिकेचा नवरा महादेव याने आपल्या स्वभावामुळे या परिवारातून कौतिकेला बाहेर पडणे भाग पाडले.

काजगुंडया, तुरपाई... शिवणी हे काम सोडून महादेव गांवातून फिरत राहायचा, गोविंदांवर सारा बोजा पडायचा त्यामुळे शिवणकाम कमी व्हायाचे आणि त्यामुळेच कमाई कमी होत होती. घरात पाच सात लोक होते, त्यांच्या जेवणांचा, कपडयांचा खर्च त्यातून भागत नसे. म्हणूनच कौतिकाचा भाऊ गोविंदा याने महादेवच्या काम न करण्याच्या वृत्तीबद्दल विरोध केला.

बायकोच्या घरी राहात असल्यामुळे महादेवलाही ताबेदारी सलत राहाते. इथेच हे एकत्र कुटुंब विभागले जाते. महादेवाची सासू गोदुबाई खटपट करून सिंगरकंपनीची नवी मशीन आणते. महादेव आपले दुसरे दुकान लावतो. आपल्या मुलाप्रमाणेच गोदुबाई आपल्या मुलीच्या संसाराला हातभार लावते. एका घराची दोन घरे होतात. गोविंदापासून महादेव-कौतिकचा संसार बाजूला होतो.

नविन वेगळे राहाणा-या माणसाचे जे हाल होतात ते कौतिकच्या नशिबी येतात. कौतिक परोळयात भाकरी शेकत असायची. जेवसाचं तेल आणि तिखटाची बुंकणी नामा-भिमला

वाढायची. शेजारच्या घरात करंज्या पापड्या पाहून लहान नामा तेलतिखटाची ताटली ठोकरून लावतो. कौतिक त्याला मारते. यापूर्वी कौतिक अशी मुलांना मारु लागली की महादेव तिच्यावर बिथरायचा." तू राक्केसीन आये। मारून तरी टाक ग्या पोट्टयाले " वैगरे म्हणायचा. त्यांना जवळ घ्यायचा. पण तोच आता एवढा निष्क्रीय बनतो की, तो नामाला म्हणतो, " एवढी मिजास होती त एखांद्या मारवाड्याच्या पोटी जल्मा जागत होतं. माहया बुडक्याच्या पोटी का बा याव१ " हा चिडखोरपणा वाढत जातो. कौतिका व महादेवच्या तावडीतून सोडवणूक कौतिकाची भावजय गंगा करते. नामाला ती अनरसे पापड्या देते हे कौटूंबिक वातावरण शेळके यांनी सामर्थ्याने चित्रित केले आहे.

निष्क्रीय महादेव मशिनचा हप्ता कसा भरायचा, चार माणसांना कशी जगवायची या केवळ चिंतेत राहतो. अखेर इथे मन लागत नाही. देव रस्ता दखवेल तिकडे जायचे म्हणून कौत्तिका, नामा, भीमा यांना घेवून तळेगांवला जातो. मेहुण्याशी भांडून, संसाराच्या कटकटीने हैराण होऊन महादेव हिंगणघाट सोडतो आणि कौतिकेच्या दुःखद कहाणीला प्रारंभ होतो.

नामाचे तिकिट न काढल्यामुळे साहेबानं अडवलेली वाट कौतिक त्यांच्या पाया पडून दोन रुपये एक आना देऊन तळणीच्या

फ्लाटावर पोहचते. उरलेली रात्र महादेवचं कुटुंब तिथेच काढते. सकाळी जात्याचा आवाज कानी येतो. याचा अर्थ असा की, त्याकाळी दळपाच्या गिरण्या नव्हत्या. विदर्भातले लोक त्याकाळी जात्यावर दळत असत.

सेंदुर्जन्यात हे कुटुंब पिशव्या, गोठोडं, लोखंडी संदूक आणि इतर ओझं डोक्यावर घेवून पोहचतं. महादेवला चहाची तलफ येते. पण हॉटेल नसल्यामुळे एका घराजवळ ते थांबतात. व-हाडच्या सामान्य मातीतला दिलदारपणे तिथे चहापाणी होते. महादेवची ओळख निघते. धोडींबाच्या घरी सा-यांचे मोठ्या प्रेमाने भोजन होते. ऐकमेकाची ओळख ठेवू म्हणून ते निरोप घेतात. ग्रामीण जीवनामध्ये असे प्रसंग भारावून ट सोडणारे असतात. खेडेगावातील जीवन यामुळेच रसाळ गोड बनलेले असते. शेळके यांनी हे ग्रामीण वातावरण, जिव्हाळा व आपुलकी चित्रित केली आहे.

कौतिकेचे शिंपी कुटुंब तळेगांवात पोहचते, त्यावेळी कुठंतरी बडवलं जाणा-या जगा-यांचा घंटेचा आवाज निनादत होता. खेडे गावांत " केव्हा आले कसे आले " हे विचारण्याची प्रथा असते. ऐकमेकास भेटल्यानंतर राम राम करणे, वास्तपुस्त करणे, ओळख दाखवणे खेडेगांवात असते. तळेगांवात या कुटुंबाचे असेच स्वागत होते.

तळेगांवातली घरे कुडाची आणि मातीची आहेत याचे वर्णन येते. तळेगांव नदीच्या काठाशी आहे. नदीचा पुर जरी गांवात आला तरी घरांना धोका पोहचू नये म्हणून तिथली सारीच घरे जमिनीपासून पुरुषभर उंचीवर उभारली आहेत.

कौतिक व महादेव जेव्हा घराजवळ पोहचतात. तेव्हा सर्वजण बायका माणसं जमा होतात. सीता म्हालीण जुन्या आठवणी काढते. कौतिका आपले व आपल्या सास-याचे पटत नाही म्हणून तेथून गेले असे सांगते. महादेव इथे ही गांवात फिरत राहतो. आपल्या वडीलाकडे मिशन घ्यायची त्याबद्दल विचारायचे असे ठरवून दिवस ढकलत राहातो.

कौतिकेचा सासरा भलताच तापट स्वभावाचा माणूस होता. त्याचा तापट स्वभावच कौतिकच्या दु:खी जीवनाला बराच कारणीभूत ठरला, तो हेक्कोड्या तोंडाचा रघुनाथ शिंपी म्हणून ओळखला जात होता. कौतिक त्याला पाणी देते पण तो फेकून देतो. स्वत:ची चूल मांडून चहा, जेवण स्वत:च बनवतो. त्याचे जीवन एकाकीवृत्तीचे ठरले आहे.

आपले काय होणार ? या अधिकाधिक विचारात पडत गेलेली कौत्तिक व महादेव म्हाता-याची मशिन मागत नाहीत. कापसाच्या वावरात काम करणे पसंत करतात. व्यवसायाने

चालत आलेल्या रुढीने शिंपी असणारा महादेव " टेल्लर" वावराच्या वाटेने लागला. मोलमजूरी करुन जीवन जगू लागला.

विपरित परिस्थितीत सापडलेले कौत्तिकेचे कुटुंब कापसाच्या वावरात मोलमजुरीवर पोट भरु लागते. चार आने रोजगाराने कौत्तिक पाटलाच्या वावरात जाऊ लागली. दुस-याला कोणाला होय म्हणू नका आम्ही येतो अशी ती पाटलाच्या दिवाणजीला काम मिळण्यासाठी विनंती करु लागली.

कौतिका व भीमा भुतासारखी राबतात. कौतिकेच्या राबण्यात कुटुंबाविषयीची तळमळ होती. मिळालेल्या पैशात ती नामाला चड्डी घेऊन देणार होती. भीमाला सदरा घेऊन देणार होती. गहू घेतांना दिलेले पाच रुपये दुकानदार दिलेच नाही असे म्हणतो. कौतिकेचा नाईलाज होतो. घेतलेली नामाची चड्डी दुस-या दुकानदाराला कमी रक्कमेत विकून बाजार करते.

कौतिका दिवाळी सण साजरा करते. अल्युमिनियमच्या ताटलीत व कागदावर फराळ भीमा-नामाला देते. सव्या रुपया पाटावर ठेवून" लक्ष्मीपूजन " करते. कुटुंबाच्या सुखासाठी तिचे स्त्रीमन धडपडत राहाते.

कृष्णा माळी भीमाला ढोरापाठीमागे राखण करण्याची मागणी करते. कौत्तिका तीन आणे करीता ती मागणी कबूल करते. त्याबद्दल महादेव रागवतो. तुझ्या माहेरचे लोक तोंडामध्ये माझ्या शेण घालतील असे बोलतो. तेंव्हा कौत्तिका " कोणी कुणाचं नसते, सख्खा भाऊ किंवा सख्खी बहिण संकटात नसते जो तो आपल्या पुरता असतो" असे जळजळीत सत्य ठणकावून सांगते.

नागदिवाळीनंतर जोराचा हंगाम सुरु होतो. कौत्तिक मिळेल तेवढे काम करत होती. दिवस रात्र राबून खंडीभर जोंधळाची कणास तिच्या घरात आली. आलेल्या पैशात हवा तो किराणा घरी नेई. कुण्या बारीणाला पानांच्या बदल्यात जोंधळे द्यायची. कुण्या परगावच्या फिरस्त्या मण्याशिवाल्याला आरसा फणी किंवा कुंकवामेणांच्या डाबल्यांच्या बदल्यात तीळ, भुईमूग, मूग मोट परवडेल ते वठं आणि तितक द्यायची. येथे विदर्भात त्या काळच्या समाजजीवनाचे वस्तूविनिमय, भारतीय खेडयांतील सच्चे आणि अस्सल जीवन चित्रण व्यक्त झाले आहे.

कौत्तिक महादेवलाही स्वस्थ बसू द्यायची नाही. महादेव पाटलाच्या घरी पाणी भरायचा. मारवाडयाचा मांडव शिंपून द्यायचा. कसे गाडू लागायचा, बिछायत अंथरु लागायचा, कुंपणासाठी बाभळीचे नाही तर बोरीचे फास बैलगाडयातून ने-आण

करायचा. शेणखताच्या डाल्यावहायचा. कुठे तरी काम मिळाले तर वावरात उग्र उन्हाळयाचा वणवा वाढला तरी कौतिकची धडपड धडपडतच होती. तिला तिच्या नव्या बाळाची जाणिव झाली होती. कष्ट कसण्यात ती झपाटून गेली होती.

लेखकानेच म्हटल्याप्रमाणे भरतीच्या गाडयाच्या एका वढाळ बैलाने मान टाकताच जसा गाडयाचा भार दुस-या बैलावर पडतो तसा संसाराचा भार कौत्तिकवर पडला आहे. स्वत:चे गरोदरपणा, बाळंतपणा यांचीही पर्वा न करता ती राबते. भीमा, नामा, महादेव यांनाही होईल तेवढे कामाला लावेते.

कौत्तिकचे बाळंतपणा सीता म्हालीणाच्या मदतीने सुखरुप होते. पोट दुखु लागतांना ती वावरातच काम करत होती. बाळंतपणाची सुईणा मांगिणबाईने केले. ग्रामीण भागातील त्या काळच्या बाळंतपणाचे वर्णन समाजदर्शन घडवते. कौतिकच्या पोटी " यशोदीचा " जन्म झाला.

विदर्भातल्या व-हाडी पुरुषाला विडया फुंकत बसणे व बायकांना तंबाखू खाणे या सवयी आहेत. महादेव केवळ विडया फुंकत दिवस ढकलत गांवात हिंडत राहातो. कौतिका त्याला पोरांना तिवशाला शाळेत नांव नोंदवायला सांगते. बाळंतपणात असलेली कौतिका " किती दिवस बसू अशी, राजाच्या रानीवाणी घरात" म्हणत पोरीचा पाळणा हालवत बसलो तर पोटाला काय मातीचे ढेकळे घालायची म्हणून स्वत:च्या पोरंगीला झोप यावी

म्हणून अफू देते व कुटूंबाच्या पोटासाठी लहान यशोदीला झोपवून ती वावरात जाते.

डोळे मिटून सुस्त पडलेल्या यशोदीला शुध्द येत नाही. तेंव्हा तिला यशोदीला अफु जादा चुकून पाजली म्हणून ती हतबल होते. " काय मले दशमानीनले देवानं बुध्दी देल्ली असन् मनाव् – का थे पोट्टी माही वयरीन होती गेल्या जन्माची I " नंतर आकाशात हात जोडून शरणागतीच्या सुरात म्हणते . " देवा शादलबुवा, माझ्या येडीबांगडीच्या हातानं काई चूकभूल झाली असन त मले उचलून ने एक्का रातीतून, पन माझ्यं फ्य असं कच्च तोडून नोको नेऊ...लागनत मी तुझ्या पाच बस्तरवार करीन पुडच्या बस्तरवारपासून."

नामाने फकिर होऊन आणलेल्या गहू, तांदूळ तर दिलेल्या जोंधळे, पैसे या भिक्षावळीचा नैवेद्य शादलबुवाला भक्ती भावाने कौतिकचे कुटुंब दाखवते. घरात न घेणारा भीमा सापडल्यानंतर त्याला बाजारात पाकिट चोरतांना जमावाने मारल्याने त्याच्या पाठीला जख्यमा व वेदना होतात. कौतिक त्याच्या हिरव्या निळया पाठीला हळद अफूच मिश्रण लावून देते. त्या काळी विदर्भात प्राथमिक उपचारासाठी अफूचं फार मोठे महत्व होते.

कौतिकच्या बि-हाडावर गरीबी, दु:ख, विपरित परिस्थिती, नेहमीचे अपयश यांची सदैव दाट छाया आहे. कोणत्याही स्वरूपाचे आर्थिक उत्पन्न मिळेल अशी व्यवस्था नाही. कुठेही या शिंपी कूटूंबाची जमिन नाही. शिलाईचे मशिन मिळत नाही.

जुने खराब झालेले मशिन सोडविण्यासाठी कौतिकेची धडपड ही खर तरं भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालच्या शेवटच्या माणसाची दररोजची जीवनाच्या प्राथमिक गरजासाठीची धडपड आहे.

कौतिक तिचा नवरा महादेव यांला आपल्या घरी भावाकडे घेवून गेली म्हणून तीला सर्वाची बोलणी सोसून घ्यावी लागतात. रघूनाथ शिंपी हा कौतिक-महादेवला असेच टोचून बोलतो. बाप लेकांचा राग वाढतो, त्यात म्हातारा रघूनाथ शिंपी टोक नसलेली कात्री फेकून मारतो. शेळके यानी समाजातील शिंपी व्यवसाय करणा-या माणसांचे सारे जग फार समर्पक उभे केले आहे.

शेती-वाडी, प्रतिष्ठा नसलेल्या भूमीहीन माणसांचे बारा बलुतदार पैकी एका शिंपी समाजाच्या परवड झालेल्या कुटूंबाची पोटापाण्याच्या प्रश्नासाठी कशी वाताहात हेत ते. हे शेळक्यांनी " धग " मध्ये चित्रित केले आहे. जीवनसंघर्षात कौतिक परिस्थितीच्या विरोधात लढत राहाते. कपडयांच्या शिलाईच्या मोबदल्यात महादेवला वापरायला म्हणून देऊ केलेल्या जुन्या मशीनच्या मोहाने तो आपले कुटूंब नत्यूशेठच्या मोझरीत आणतो. पाच वर्ष खराब झालेल्या मशिनसाठी एक कुटूंब दुस-या गांवाकडे स्थलांतर करते. तिथे राहण्याची व्यवस्था होत नाही. आणि मशिन वापरण्याच्या लायकीची नसते. अशा विचित्र अवस्थेत त्यांना पोहचवायला आलेल्या

सुकदेवला ती अत्यंत खाजगी सुरात म्हणते, " बापूजी, गावात कोनापासी सांगून नोका आम्बवं असं काई झालं मून-तुमाले माझ्या गयाची आन् "... ग्रामीण जीवनात संसाराची अब्रु महत्वाची मानले जाते. आपली वाईट परिस्थिती झाकण्याचा प्रयत्न केला जातो. आपले हासू होवू नये म्हणून आपल्यापरीने प्रयत्न केला जातो. कौतिकलातेच सखदेवला सांगावयाचे आहे.

भीमा स्टेशनवार हजामती करणे सुरु करतो. तेव्हा महादेव भीमाच्या अशा वागण्यामुळे आपल्या जातीतले लोक वाळीत टाकतील अशी भीती वाटते. त्याकाळी एका जातीचा व्यवसाय, धंदा, काम दुस-या जातीने करणे चुकीचे समजले जात होते. कासमच्या घरी पाणी पित असतांना मुसलमान असलेल्या त्या कुटुंबातले लोक आम्ही मुसलमान आहोत. याचा उल्लेख करततात. त्या काळी एका जातीच हिंदू-मुसलमान हे धार्मिक भेद समजले जात होते. ऐकमेकाच्यात रोटी व्यवहार होत नव्हता.

पाच वर्षे वय असलेली मोडकीर मशिन महादेवला देवून त्याबद्दली आपले व नोकर चाकरांचे कपडे शिवून घेणारारा संपूर्ण व्यापीरी वृत्तीचा मारवाडी सावकार नत्युशेठ याचे व्यक्तिचित्रण पाहावयास मिळते. कौतिक व तिचे कुटुंब जसे शादुलबुवा, मोहरम हे मुस्लीम उत्सव साजरे करतात. तसेच कासम-सकीना हे मुसलमान लोहाराचे कुटुंब हिंदूचे दैवत महादेवाच्या जुनेत सहभागी होतात

होऊन भक्तीभावाने जत्रा साजरी करतात. हिंदू-मुस्लीम यांच्या परस्परसंबंधाच्या प्रेमाच्या धाग्यांचे चित्रण येथे साकार झाले आहे.

कौतिकच्या बाळंतपणात मंगीण सुईण बनते. त्याकाळी विदर्भातल्या खेडेगावात डॉक्टर, दवाखाने नव्हेते. भीमा हिंदीत बोलतो, गाणी म्हणतो, ब-हाडी भाषेवर हिंदीचा प्रभाव जाणवतो. कासमची मुलगी बानो हिचे लग्न दोनशे रुपये नाहीत म्हणून मागे पडून राहीले. आहे. भीमा त्याचा मित्र शामराव, नागो ही तरुण पिढी जुगार, चोरी, प्रेमाची लफडी, वासना यांचे बळी आहेत. भीमा व मुसलमान त्याचा मित्र बशीर सर्कसमध्ये कुली म्हणून राबतात. ही तरुण पोरे विडया ओढतात. कासमच्या वयात आलेल्या बनोला पाहू भीमा शेरा मारतो.

" हुस्नने मारी आँख तो जवानी हुई बर्बाद। "

पोळयाचा सण सर्वजण उत्साहात साजरे करतात. भीमाने तरुण पोराबरोबर गोठण्यावर जुगार खेळणे ही बाब कौतिकला खटकत नाही. पोळा सणादिवशी जुगार खेळण्याची प्रथा होती. खेडे गांवात रिवाज होता.

स्वतःच्या नुकत्याच जन्म घेतलेल्या बाळाचा मृत्यू झाल्यानंतर थोडयाच अवधीत मोलमजूरीला लागते. तिचे सारे

तत्वज्ञान जीवनाविषयीचे ती सकीनाला सहज बोलते,
" कइशील तर खाशीन रांडे, नाई त उपाशी मरशील।"

त्याकाळी विज्ञान युगाचे वारे विदर्भातल्या खेडेगावा-ना लागले नव्हते. समाजामध्ये जाती व्यवस्था पक्की होती. सामाजिक समतेचे वारे हिंगणघाट, मोझरी, तळेगांवाला अद्याप पोहचले नव्हते. धार्मिक रुढी बरोबरीने दैववादावर नियतीवर माणसाचा हाती दुसरे कांही नव्हते. " देव कसा आमच्या मागं हात धुवून लागला बिचारा, त्याच्या मनात काय असन थे त्यालेच माईत " ही कौतिकचे बोल त्या काळच्या ग्रामीण समाजजीवनाचे दैववादीवृत्तीबद्दल बोलके वाटतात.

" धग " असणे म्हणजे जीवनासक्तीची प्रेरणा सतत असणे होय. कौतिकच्या ठिकाणी ही प्रेरणा द सदैव होती. भीमा-बानो प्रकरणात भीमाने केलेली अनैतिक गोष्ट, बानोची गेलेली अब्रू या प्रसंगामुळे अनेक आपत्तीपुढे बेडरपणे समोरे जाणारी कौत्तिक दुबळी बनते. त्या काळच्या नैतिक जीवनाचे महत्व न कळत प्रकट झाले आहे. कौतिकचा कष्टणारा जीव तिचा नवरा चोराकडून कपडे नि पैशासह लुबाडला गेला तेंव्हा तो आला नाही म्हणून खचत राहातो.

विवाहसंस्था केवढी प्रबळ होती. याचे दर्शन कौतिक-महादेव यांच्या संबंधावरुन दिसून येते. पती म्हणून महादेव विषयी तिच्या मनात अपार श्रध्दा होती.

म्हणून ती अमरावतीला जाऊन महादेवला घेवून येते. त्याला आधार देते. त्याने नवरा म्हणून जगावं असे तिला वाटणे स्वाभाविक आहे. आपल्या नव-याने चारचौघासारखं राहावं, जगावं अशी तिची इच्छा होती. बिघाडलेल्या नव-याला गांवातील लोकांना समजावून व संगण्यसाठी ती विनंती करत होती. स्त्री मनाचे सैरे सारे कंगोरे येथे अर्थवाहीपणे सामर्थ्याने व्यक्त झाले आहेत.

कुटुंब पध्दती मधील पिता-पुत्र नातेसंबंधाचा बेबनाव अप्रिय प्रचिती रघुनाथ शिंपी व महादेव यांच्यात दिसून येते. आपल्या आयुष्याचा अखेरचे क्षण मोजीत असतांना. तसा निरोप येऊनही, महादेव रघुनाथला पाहायला जात नाही. अखेर कौतिक नातेसंबंधाला सून म्हणून जगते. ती म्हाता-याचे दिवसपाणी करते. आयुष्यभर कौतिक-महादेव यांच्याबरोबर भांडणारा चोरीचे आरोप करणारा, वेगळी चूल मांडणारा, रघुनाथ मृत्यू पावल्यानंतर कौतिक आक्रोश करते. ती ऊर बडवून घत म्हणाते,

" बुढा मोठा टेकबाज होताओ -
त्याने आपली टेक पूरी केलीओ -
जन्मभर आबचं मुख पाहात नाई मनल होतंओ -
आता माझ्यासंग कोन भांडत जाईल ओ...
मले माझ्या घरातून निंघा मून कोन मननओ..."

रघुनाथ शिंप्याच्या दिवस पाण्याला आपला भाऊ गोविंदा आला नाही म्हणून त्याच्यावर चिडते.

जीवनावर सदा वैतागलेला, संसारातून मन उडालेला महादेव महारोग झाल्याने यात्रेतून परत येत नाही, ख्रिश्चन मिशन-यांचे पाद्री त्याला घेवून जातात या बातमीने कौतिक खचते. तिची जीवनप्रेरणा नष्ट होते." नवरा " ही प्रेरणा तिची मुख्यशक्ती होती. त्याच्या तिच्या जीवनातूनन जाण्यामुळे ती पार वेडी होऊन जाते. पराभवाची मालिका तिच्या मागे सतत लागली आहे. पायदानाचे ही ह जमिनीवर पडून तुकडे होतात अगदी तसेच तिच्या इच्छा, आकांक्षाच्या जगण्याचे तुकडे होतात.

वेडया झालेल्या आईच्यामुळे निराधार बनलेला गुणी, हुशार नामावर कोवळया वयात कुटुंबपोषणाची जबाबदारी येऊन पडते. नामाचे मूकरुदन समाजातील आर्थिक विषमता चित्रण करते. भांडवल शाही समाजव्यवस्थेने त्याला पशुच्या पातळीवर जीवन जगायला भाग पाडले आहे.

आता आपण " धग " मधील समाजजीवनातील समाजमन, लोकरुढी, सामाजिक परिस्थिती, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक संस्कृती इ. बाबी तपशिलवार अभ्यासू.

" धग " मधील धार्मिक परंपरा

शिंपी कुटुंबाचो ही संसार कथा आहे. कौतिक व तिचा नवरा महादेव यांचे हिंदू धर्म पध्दतीने लग्न झालेले

आहे. नव-याला देव मानण्याची परंपरा हिंदू धर्मात आहे. नव-या काम करत नाही, आळशी आहे म्हणून ती त्याला घटस्फोट देत नाही. ती त्याच्यावर प्रेम करते. आपल्या नव-याला ती सन्मान देते. हिंगणघाटवरुन रेल्वेतून जातांना ती मोकळया झालेल्या जागेवर आपण न बसता मुलांना बसायला लावून महादेवला गोठोडयावर बसायला सांगते व आपण स्वत: उभी राहाते.

हिंदू लोक दिवाळी सण मोठयाप्रमाणात साजरा करतात. कौतिकही दिवाळी सण साजरा करते. गव्हाचं दळण चकल्याच पीठ, मैदा-रवा, यांचे पोळया, चकल्या, लाडू, करंजी हे पदार्थ बनवते, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आंब्याची पाने, झेंडूची फुले यांचे तोरणं करते. ही धार्मिक प्रथा आहे. बनवलेलो तोरण ओसरीत, दाराला, देवाला शिंपी कुटुंब लावते, बांधते. दिवाळी सण आणि रांगोळी यांचे अतूट नाते आहे. कौतिका दारात रांगोळी काढते.महादेव पाट मांडतो, पाटावर तांबडया तुसाचा तुकडा अंथरतो. त्यावर कौतिका कमरेचे करदोडे, चांदीच्या बेडया ठेवते, हिंदू धर्मात लहान मुलाच्या कमरेला चांदीचे करदोडे बांधतात, " धग " मध्ये भीमा-नामाच्या कमरेला करदोडे आहेत. तसेच हिंदू धर्मात सव्वा रुपयाला धार्मिक गोष्टीत महत्त्व दिसते. कौतिका दिवाळीच्या लक्ष्मी-पूजनाला सव्वा रुपया ठेवते. दिवाळी

सणाच्या फटाक्या वाजवतात, बत्ताशांचा गोड प्रसाद वाटतात.

भारतामध्ये हिंदूचे सण मुसलमान करतात आणि मुसलमानाचे सण साजरे करणारे कित्येक हिंदू लोक आढळतात. हिंदू आणि मुस्लीम बंधुभावाने राहातात. कौतिक मोहरमरचा सण मोठ्या भक्तीभावाने साजरी करते. या शिंपी कुटुंबाच कुलदैवत शादलबुवा आहे. मुर्हूताचे फार मोठे महत्व हिंदू समाजात दिसते. शादलबुवाचं वार्षिकद देण दिल्यानंतर धंदा सुरु करावा अशी ती नव-याला बोलून जाते.

मोहरमच्या सणादिवशी नामाला ती झोळी देऊन मोहरम मध्ये फकिर बनवते. " हासेन हुसेन धुल्ला" म्हणून पाच घर भिक्षा मागायला लावते. नैवेद्य दाखवणे ऊद जाळणे, अबीर वाहाणे कौतिका करते. ती शादलबुवापुढं डोक ठेवते आणि हिंदूच्या देवाला नमस्कार करतात तसाच नमस्कार करते. ग्रामीण लोक दैववादी, परमेश्वराला सर्वश्रेष्ठ मानतात, त्याच्यापुढे नतमस्तक होतात. कौतिक नमस्कार करतांना म्हणाजे, " बाप्पा शादलबुवा, मेली येडी बागडीले काई नाई समजत. चुकलं माकलं थें पोटात घाला. हमा सर्वा तुहाच फापटपसारा आये. तारसीन तर तारत जा आन् मारसीन त मारत जा।"

ग्रामीण जीवनात धार्मिक सणांना फार महत्व असते. सामुदायिक पध्दतीने ते साजरे होतात. " धग " मध्ये मोहरम, दिवाळी सण कौतिका साजरे करते.

ग्रामीण जीवनात पोळा सणाचे फार महत्व असते. शेतकरी लोकांच्या जीवनाशी संबंधीत बैलांच्या उत्सवाचा हा सण लोकप्रिय आहे. बैला-वासरांना अंगावर झुला घालून त्यांना नव्या को-या घंटा घालूंन ही सजवलेली बैले गांव-ठाणावर आणतात. कांही बैलांच्या अंगावर मखमलच्या झुला, चांदीचे मणके परिधान करुन, बारा महिने शेतात राबणारा शेतकरीही नवी कपडे, गुंलाबी फेटे परिधान करुन आनंदात हा पोळा साजरा करतो. श्रमाला प्रतिष्ठा देणारा हा पोळा सण, त्या दिवशी बैलांना आरतीने ओवाळतात आणि त्याच्या पायावर पाणी घालून मस्तकावर गंधाक्षता लावतात.

कौतिक आणि तिचे कुटुंब हा पोळा सण साजरा करतात. कौतिका बैलांना नैवेद्य दाखवते. पाणी फेरते. पाया पडते. आणि शेवटी भेट म्हणून पैशाची नाणी शेतक-याना देते. बानो, सकीना कौतिकासारखी या सणांत सहभागी झालेली दिसत नाहीत. कौतिकासारखी पूजा वैगरे करत नाहीत.

" वैरी दुस्मानाले घेऊन जा यओ मारब्बता " किंवा " खासी, खोकला-रोगराई घेऊन जाय रे बडूग्या " असे जोराने कौतिकासह सारा गांव मोठयाने म्हणातो, सण सजरा

केल्यानंतर दुस-या दिवशी पहाटे सकाळी सारी मोझरी गांवच्च म्हणते. त्या काळी खेडे गांवात रोगराई, संकट येत असे ते दूर पळून जावे म्हणून पोळा सणादिवशी लोक मारबतास अप्रत्यक्ष सांगत असण्याची प्रथा होती. ती एक रूढी होती. त्यामुळे आपले सरंक्षण होईल अशी लोकांची समजूत होती.

गांवातल्या लहान मुलांच्यासाठी " तान्हा पोळा " हा ही एक पोळा सणातील उपप्रकार दुस-या दिवशी साजरा होतो. मातीचा बैल कुंभार लोक बनवून ते प्रत्येक गांवात, घरात देतात, लहान मुले त्यांना गावभर फिरवून, पैसा मागतात. अशाच प्रकारची सारी वर्णने " धग " मध्ये येतात. ग्रामीण भागामधील विशेषत: विदर्भातल्या हिंगणघाट तळेगांव, मोझरी या परिसरातील धार्मिकभावना, धार्मिकसण यांचे शब्दचित्रण शेळक्यांनी वास्तवतापूर्ण पध्दतीने केलेले आहे.

ग्रामीण भागात हिंदू-मुस्लीम एकमेकांच्या जीवनात मिसळून वागतात याचा प्रत्येय येतो. " धग " मध्येही मारुतीच्यापायावर भजनासाठी मुसलमान कासम हा महादेवबरोबर भजनाला जातो. " मंगलमय नाम तुझ - सतत गाऊ दे " असे भजन म्हणतो. कासम मुसलमान असूनही त्याला भजन गाण्याचा पहिला मान गांवकरी देतात. त्या काळच्या भागवत संप्रदायाने धर्मभेदभाव, जातीभेद मानला नव्हता. लोकशाही स्वरूपाचे एकोप्याचे वातावरण पंढरीच्या वारकरी संप्रदायाने निर्माण केले होते त्याचा विदर्भाच्या जीवनातही प्रभाव जाणवतो.

हिंदू धर्मात मृत्यू पावल्यानंतर " मातीचा दिवस " हा धार्मिक विधी केला जातो. माणूस मृत्यू झाल्यानंतरच्या तिस-या दिवशी हा विधी केला जातो. कौतिकच्या यशोदी नंतरच्या मुलाचा जन्म घेतल्यानंतर मृत्यू होतो तेंव्हा असाच तिसरा दिवस " मातीचा" करतात. गोमूत्र, दूध घेऊन स्मशा-नातील माती सावडतात. भीमा झाडाची पाने खुडतो, बाभळीचे काटे टोचून त्याचा द्रोण करतो. द्रोणात दूध आणि गोमू त्र टाकून उदबत्ती लावून नमस्कार करतो. कौतिकचा सासरा रघुनाथ शिंपी मरतो तेव्हाही हिंदू धर्म पध्दतीने त्याचे " बारा दिवस " ती करते.

मुसलमान धर्मातल्या विवाह पध्दतीचे वर्णन शेळके बानोच्या विवाहाच्या संबंधी करतात. पण ते थोडेच येते. कासम मुलाचे घर पाहायला जातो तो नवरा मुलगा भाड्याने टांगा काढून जगणारा आहे. त्याच्याबरोबर बानोची " सगाई " होते. कौतिकला बाखड्याचा घरजावई घर गहाण प्रकरणी फसवतो. ती चौकशी करते तेंव्हा दिवाणजी तिला कोर्टात दाद माग जा म्हणतो. तेंव्हा कौतीक तिला गाईचं शेपूट धरुन घर विकत घेतले आहे असे सर्वांच्या समोर बोल असे सांगते. हिंदू धर्मात गाईला परमेश्वर मानतात. कौतिकचा कोर्ट-कचेरीपेक्षा " गाई "वर विश्वास आहे. तो खोटे बोलणारा नाही अशी तिची समजूत आहे.

कौतिक " शिंपी " जातीतली आहे. सकीनाच्या घरचे मटण पाहून ती थुंकल्यासारखे करते. तिचे तिकडे लक्ष जात नाही. " धग " मध्ये शेळके यांनी धार्मिक वातावरण, धार्मिक भावना, संस्कार न कळत प्रकट केले आहेत. महादेवाच्या जत्रेला जाणारी अनेक माणसे, त्यामध्ये कासमचा सहभाग. संसार संन्यास घेणारा गोसाईबुवा यांचे ही चित्रण झाले आहे.

कासमबरोबर गेलेला महादेवला महारोग होतो. तेंव्हा ख्रिश्चन मिशन-यामध्ये सेवाभावी वृत्तीने, धर्म प्रसाराच्या कार्याने काम करणारे पाद्री लोक त्याची सेवा करतात. उपचारासाठी त्याला आपल्याबरोबर नेतात. येथे " धग" मध्ये धार्मिक परंपरा, धार्मिक संसार, सांस्कृतिक जीवन, धार्मिक रूढी, संकेत, धार्मिक श्रध्दा इ. बाबी कशा चित्रित झालेल्या आहेत ते पाहिले आता आपण " धग " मधील आर्थिक परिस्थिती अभ्यासू.

" धग " मधील आर्थिक परिस्थिती

" धग " मध्ये व-हाडच्या ग्रामीण जीवनातील सारी वास्तवता दृष्टोत्पत्तीस येते. " धग " मधील दुःखाची ज़बाबदारी अनाकलनीय नियतीवर सोपविण्यापेक्षा त्याची कारणे भांडवलशाही समाजव्यवस्थेत शोधली पाहिजेत. असे मराठी समीक्षक स. त्र्यं. कुल्ली यांना वाटते. तर

डॉ.प्रा. र. बा.मंचरकर यांना " धग " ही एका कुटुंबाची दु:ख कथा असली तरी तिच्यामागे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा, जातिव्यवस्थेचा, आणि समाज जीवनाचा एक व्यापक पण सूचक संदर्भ सतत जागता ठेवला आहे, असे जाणवते.

कौतिकच्या शोकांतिकेला कारणीभूत विशिष्ट समाज-व्यवस्था होती असे शेळके स्पष्ट करु शकले नाही तरी तरी वाचकाला जाणवत राहाते. त्या काळची विदर्भातील ग्रामीण जीवनामधील आर्थिक व्यवहार मर्यादित होते. अर्थव्यवहार आजच्या इतके गतीमान नव्हते. बलुतदार पध्दतीचा अद्यापही प्रभाव असल्याने विदर्भातली हिंगणघाट- मोझरी ही कांहीशी स्वयंपूर्ण खेडी होती, असे जाणवते.

महादेव, गोविंदायांचा खरं तर जातीचा धंदा म्हणावा तर शिप्यांचा आहे. हिंगणघाटला कौतिकच्या भावाचे शिवणाचे मशीन असते. हिंगणघाटचे लोक परंपरागत शेती व्यवसाय करीत असतात. शेतक-यांची आर्थिक परिस्थिती बेताची होती. देश तसा वेश या प्रमाणे त्याकाळी लोक बांडीसा, चोळया, चड्डी, कुडते यांचा कपडे म्हणून वापर करीत होते. कपडयांना इस्त्रीची गरज नव्हती. लोक साधे राहात होते.

कौतिकची आई गोदूबाई मिलमध्ये कामगार होती. तिला मिलात दहा रुपये मिळायचे. यावरुन त्याकाळी माणसांचे दरडोई

उत्पन्न फारच ब्रेताचे होते. गोविंदच्या मशिनचा स्वस्ताईत अठरावीस रुपये हप्ता येत होता त्याकाळी हप्त्यावर मशिन मिळत होती, असे दिसते. गोदूबाईच्या प्रयत्नाने सिंगर कंपनी-तून नवी मशिन महादेव आणतो. महिन्याला पाच रुपये महादेवला कंपनीत भरावे लागत होते. हिंगणघाटला रेल्वे आली होती. हिंगणघाट ते वर्धा हा प्रवास कौतिकचे कुटुंब रेल्वेच्या डब्यातून करते. मात्र आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने नामाचे तिकिट न काढल्यामुळे त्यांना तिकिट चेकर दोन रुपये एक आना दंड करतो. " आना " हे चलन त्याकाळी चालत होते आणि त्याला महत्व होते. कृष्णा माळी भीमाला तीन आणे देऊन ढोरामागे दिवसभर राखण करायला लावतो. कापसाच्या वावरात काम करायला पुरुषाला पाच आणे व बायकांना तीन आणे रोजगार दिवसाला पडत होता.

त्याकाळी रेल्वे किंवा बैलगाडीने लोक प्रवास करत असत ज्यांना जेवण मिळत नसे ते चिरमुरे-फुटाणे खाऊन दिवस काढत. महादेव पाच रुपयांची नोट दुकानदाराला नामाच्या चड्डीसाठी देतो. पण तो नोट दिलीच नाही असे म्हणतो. त्यासाठी दुकानदार व महादेवचे भर बाजारात हातघाई, भांडण होत

कौतिकचा दिवाळीचा बाजार तीन रुपयात होतो. त्यामध्ये ती मैदा, रवा, गहू, तांदूळ, तेल आणि मुलांना फाटाक्या घेते एवढी स्वस्ताई होती. धान्य मोजण्याचे माप एखाद्याजवळच

असे. त्याच मापानं आलटून पालटून सारी माणसे आपली धान्य विकत असत. आलेल्या पैशात किराणा विकत घेत होती.

वस्तुंची देवाण-घेवाणं होती, बारीणाला पानांच्या बदली जोंधळे कौतिक देत होती. फिरस्त्या मण्यारीवाल्याला तीळ, भुईमूग, मूग देऊन आरसा फणी किंवा कुंकवा मेणाचे डाबले घेत होती. पैसा मुबलक नव्हता. श्रमाचे मोल पैशात केले जात नव्हते. रोजगारी कामाबद्दल राबणाऱ्याला धान्य, जेवण दिले जात होते.

कौतिकेने कष्टाने राबून मिळवलेले सारे धान्य विकून वीस रुपये होतात. घरातली चांदीची बेडी, कौतिकच्या गळ्यातली चांदीची सरी, नामाचा कमरेचा चंदीचा करदोडा या साऱ्या भांडवलावर महादेवचा तयार कपडयाचा व्यापार सुरु होतो. सुताचे मोजे, गंजी फ्रॉक्स, सुती मफलर्स, खादीच्या टोप्या, झबली, कानटोपरी, यासह पुष्कळ रंगाजातीची कपडे खरेदी करून महादेव आणतो.

चहामध्ये गुळाचा वापर केला जातो. साखर आढळत नाही. घरात सामान, किराणा ठेवण्यासाठी मडक्यांचा वापर केला जातो. घरे मातीची, कुडाची आहेत, मारवाडयाचा वाडा मात्र टोलेजंग आहे. नटयूशेटचे दात सोन्याचे आहेत.

आर्थिक परिस्थिती आणि पोटाच्या भूकेसाठी सारे जीवन दु:खद बनले आहे. बशीरच्या सांगण्यावरून रोज आठ आणे मिळतात म्हणून भीमा सर्कसमध्ये काम करतो. हमाली, चंपी मालिश, चो-या, पाकिटमार करतो. जास्त पैसे मिळवायच्या आशेने जुगार खेळतो, व्यसनी बनतो.

अमरावतीला व्यापारासाठी गेलेला महादेव चोराकडून लुटला जातो. रूपये २१० ची लूट त्याला वेड लावते. त्याला आपण आयुष्यातून लुंटलो, उठलो असे वाटते. २०० ते ३०० रूपये यांच्या दरम्यान सारे आयुष्य सामान्य माणसाचे होते. नामाला पुस्तक-वहया मिळत नाही म्हणून शाळा सोडावी लागते. आर्थिक परिस्थितीमुळे त्याच्या जीवनाला वाकडे वळण लागते. शिक्षण झाले असते तर त्याला नोकरी मिळाली असती मात्र त्याला शाळेतून हाकल्याने त्याच्या जीवनाची फरफट झालेली आढळून येते.

पैसा-अडका नसल्यामुळे शिंपी कुटूंबाचा तोल गेला आहे. त्यामुळे त्यांच्यासमोर सदैव विपरित परिस्थिती येत राहाते. एका गांवातून दुस-या गांवाकडे आशेने पाठीवर बि-हाड घेवून जातात. नथ्थूशेठ शिवण मशीन देईल अशी खोटी आशा वाटते. त्यासाठी तो गांव सोडतो. एका मशीनवर

त्याचे जीवन, संसार अवलंबून आहे तो एकदा व-हाडी भाषेत सहज बोलूनही जातो. " मले वाट्टे का यो नत्थूशेठ मिसान देईल त हाताखालच्या दोन पोट्टयाईलेई चांग धंदा सिकवान होईल. आपले पोटही भरते आन् इस्वराच्या किरपेनं चांगल वागलं त वर्सा दोन वर्सात एखादं एक्करभर वावरई पायता येते. समज, हया गोठा दुरच्या झाल्या, पन मान्साच्या जिवाले आराम त होईन" अशी त्यांची जीवनाविषयी तळमळ तो कौतिकला सांगतो.

कासम-सकीनाचे कुटुंब आर्थिक परिस्थितीने बेजार झालेले आहे. लोहार काम करुनही " हातावरुन आनून पोटावर खा " अशी त्यांची परिस्थिती नाजूक आहे. त्यांच्या बानो नांवाच्या मुलगीचे लग्न करायला पैसे नाही म्हणून ती वयात येऊनही तिची शादी होत नाही. शेळया विकून आलेल्या पैशात भाडयाने टांगा चालवणा-या मुस्लीम पोराबरोबर सकीनाची सगाई, लग्न होते. कासम कौतिकच्या कुटुंबाला जागा देतो. पण त्याचे घरभाडे घेत नाही. उलट त्यांना प्रत्येक संकटात मदत करतो.

जीवनात सत्ता आणि संपत्ती यांनीही बोहोश झालेली एक " जमात " सर्वत्रच पहायला मिळते. तिची जात म्हणजे

उन्मत्तपणाने गोरगरिबांना छळणारी मजुरी. बारखडया व त्याचा घरजावई, दिवानजी याच जातीचे आहेत. दहशात, लुबाडणूक फसवाफसवी करुन श्रीमंती टिकवतात. कष्टकरी, अडाणी व गरीब कौतिकला ते रघुनाथशिंपी या तिच्या सासऱ्याने घर विकले असे सांगतात. खोटी खरेदीपत्रक कागद दाखवतात. धनदांडगेपणापुढे कौतिकचा शेजारी सुखदेव खरी रुजवात देण्यास कबुल होत नाही.

शेषरावच्या दुकानात नामाला काम शिकवण्यासाठी ठेवण्यासाठी कौतिक लाचार होऊन बोलते. त्याच्या पाया पडते. त्याला मशिन द्यायचा शब्द देते. गणपत कलाल हा कौतिकने म्हातारा सासरा रघुनाथ शिंपी मृत्यू झाल्यानंतर त्याचे दिवस करण्यासाठी घेतलेल्या दहा रूपयाचे, पंधरा रूपये करतो. पाच रूपये तो माणूस मृत्यू पावला म्हणून कमी व्याज घेतो नाही तर दहारुपये व्याज घेतले असते असे सांगतो. पाच रुपये व्याज कौतिकने दिले नाही म्हणून दिलेल्या दहा रुपयाकरिता मशिनचे पायदान तेवढे घेवून जावा असे सांगतो.

" धग " मधील सारी माणसे पोटाच्या मागे लागली आहेत. ६ आर्थिक विषमतेमुळे कौतिकच्या वाटयाला दु:ख आले आहे. भूमीहीन असलेल्या या शिंपी कूटूंबाला स्थैर्य कसले ते माहीन नाही. त्यांचा सारा प्रवास जीवनाच्या

प्राथमिक गरजाच्यासाठी भटकत राहीला आहे.कौतिकची आर्थिक छळणूक, पिळवणूक झाली आहे. त्यामुळे कौतिकचे कुटूंबाची वाताहात झाली आहे शेवटी शाळा शिकणा-या हूशार, गुणी नामावर वेटर होऊन आपल्या कुटूंबाच्या पालन पोषणांची जबाबदारी पडते. तो ही परिस्थितीचा गुलाम बनतो.

" धग " मधील भाषा शैली व संवाद

उद्धव ज. शेळके यांनी ही कादंबरी निवेदनात्मकस्वरुपात सांगितली असली तरी संवाद रुपात ती अधिक बोलको वाटते, तीचा प्रभाव जाणवतो. कादंबरोचे कथानक हिंगणाघाट ते मोझरी या अमरावती-वर्धा पट्टयात घडते. या विदर्भाच्या भागात व-हाडी बोलीभाषा आहे. या बोलीभाषेतून संवाद लिहिले गेल्याने ते अधिक प्रभावी झालेले आहेत.

महादेव अमरावतीला राहातो. त्याला घेऊन जाण्यासाठी आलेली कौतिके त्याचे ते सोंग पाहून म्हणाते.

" आन हे असं सोंग काबा घेऊन बसले ? "

माहादेवाची मर्जी "

असं शब्दापुरुट माहादेव माहादेव नोका नोका कक

काय झालं ये मुकाटथान सरकं सुदं टाका सांगून..."

" मान्साले वैताग आला मंजे थो असाच देवाचा धावा करत असते",

अशाप्रकारे पात्रानुकूल भाषा वापरली आहे. कौतीकच्या

जिद्दीपणाचे असेच वर्णन येते. लुटला गेलेला महादेव कौतिकला सांगतो.

" दोनसे धा रुपये " महादेव स्वत:च्या तंद्रीत बोलू लागला, " मानुस इचार करते एक आन् होते भलतं, म्या मनलं नेरचा बाजार उरकल्यावर दीडसे रुपये मालवाल्याईचे देऊन टाकावं... आन् उरलेल्या पैशांत तिवशावाल्या शेषरावाची जुनी मिसन इकत घ्याव..."

" जाऊ द्याओ माय, असे कितीक गेले कोटयान् कोटी. जीव वाचलाना ? लय झालं ! "

" वाटतं काय थ्या जीवाले ? " महादेव एकदम म्हणाला, माल गेला पैसे गेले, धंयातली इज्जत गेली..."

" मोठ मोठयाची जात असते, मून काई सारेच आपले बायकापोरं टाकून देत न्हाई, अशी तीची जिद्दीची

भाषा आहे.तर महादेवची मवाळ भाषा आहे. बारवडयाच्या भाषेत घमंड आहे. नामा केवलवाणी भाषा वापरतो तर भीमाची बेदरकार हिंदी मिश्रित मराठी आहे.

" धग " मध्ये आलेले वाक्यप्रचार व म्हणी

कौतिकला बाळंतपणाच्या वेदना वाटेत लागतात ती भीमाला महादेवला सांगायला पाठवते. मात्र ती घरात पोहचते तेंव्हा कामहादेव कौतिककडे जायाला टोपी शोधत असतो. तेंव्हा कौतिक व-हाडीभाषेत " तुमचाच लेक् श्रो । खान तशी माती आन् गहू तशी रोटी " किंवा " सारा सापा आणि देवबाप्पा" असे वाक्यप्रचार म्हणींचा वापर आढळतो.

" तारसीन त तारत जा आन् मारसीन त मारत जा ।" भीमा पाकिट मारताना सापडल्यानंतर कौतिक वैतागानं बोलत होती." नाई तरी असाच्या पोटी काऊस जल्मून त्याईचा फायदा काय ।

" सुका माल कुत्ता न खाये " अशा म्हणी कामाची टाळाटाळ करणा-या महादेवला ती म्हणते, " यालेच मनते मनी नाही चांदणं आणि नांदोक्यावर बंदी आणांणा" किंवा " लेका तकदीर तर चारीखून भोक आये त्याले तू तरी काय करशीन आणि मी तरी काय करुं ? " अथवा " देव कसा आमच्या माग हात धुवून लागला बिचारा" असे वाक्यप्रचार दिसतात.

" चुडियां भरके चुला फुंक " असा हिंदी वाक्यप्रचार बशीरच्या संवादात येतो. कौतिक रघुनाथ शिंप्याच्या स्वभावापेक्षा वचवचढ सीताला सांगतांना म्हणते, " यो हेक्कड आये त मीई त्याच्या परास दोन काकनं सिवाई आये मनाव्"

महादेव शिंपी नामाला म्हणतो, " तुले कसं माईत राईनगा । तू व्होय कोनाचा, आणि तसी वानी आन् होसीन कोनावानी । " तसेच " बांगडया भरुन चुलीपाशी राय बूसान" " खाता क्यहां तो होटलमे आन् सोता क्यहॅा तो मोहरमें, " गावं करन थे राव नाई करत" किंवा " कुत्र्याचं सेपूट नईत घातल्यानं कुठिसा सरकं व्हाले बसलं । " अशा म्हणी व वाक्यप्रचार येऊन जातात.

> " करसीन त खासीन रांडे, नाई त उपाशी मरसील "
> किंवा " राजा मेला त राज नसते बुडत आन् नवरा
> मेला त घर नसते पडत..."
>
> " मले थोडेच तुमच्यावानी इचवाचं बि-हाड पाठीवर
> घेऊन या गांवातून त्या गांवात फिरता यीन "
> " माहे गंगेत घाडे न्हाले...असे वाक्यप्रचार व म्हणी

यांचा संवादात वापर केला आहे. त्यामुळे वातावरणाबरोबरच व्यक्तिचित्रणाला उठाव आलेला आहे.

एखादा कादंबरीकार कोणती भाषा वापरतो यावरुन त्याच्या कादंबरीतील सामाजिकतेचे स्वरुप प्रकट होण्यास मदत होते " धग " मध्ये कौतिक, महादेव, भीमा, नामा, रघुनाथ सकीना, कासम, बानो, सीता, इ. सर्व व्यक्तींची भाषा व-हाडी आहे. मनात येईल ते बोलावे, आडपडदा ठेवू नये अशा खेडयातल्या माणसांचा स्वभाव रोखं असल्यामुळे प्रथमदर्शनी तरी इथली भाषा खडबडीत आणि अर्वाच्च वाटते. काही मोजक्या शिव्यांचा आहेर ही व-हाडी बोलीभाषेत आढळतो.

कौतिक-महादेव, कासम-सकिना यांच्यासह सर्व व्यक्तीरेखा अर्थवाही बोलीभाषेत बोलतात. व्यक्तींचे अनुभवविश्व संवादातून साकार होते. संवादात बोलीभाषेच्या वापराचे अतिरेकपणा टाळला आहे. आवश्यक तेवढेच गरज असेल तिथे संवाद आलेले आढळतात. व-हाडी भाषेतील म्हणी व वाक्यप्रचार यांनी विदर्भातल्या प्रादेशिकतेच्या ग्रामीण जीवनाचे वेगळे रंग खुलविले आहेत. " धग " ची भाषा व संवाद तसेच संवादातील म्हणी व वाक्यप्रचार यांनी समाजजीवनाचे दर्शन घडविले आहे.

## " धग " मधील शैक्षणिक परिस्थिती

शिक्षणामुळे समाजातील सामाजिक वातावरण बदलते. समाजाच्या शैक्षणिक परिस्थितीवर तेथील सामाजिक मन तयार होत असते. " धग " च्या कथानकामध्ये सारा ग्रामीण भाग येतो. त्याकाळी नुकतेच शिक्षण खेडेगावांत पोहचले होते.

कौतिका, महादेव, गोविंदा, गोदूबाई, गंगा, कासम बानो यांचे शालेय शिक्षण मुळीच झालेले नाहीहे सारे लोक निरक्षर आहेत. महादेव सिंगर कुपनीतून कोंकी करकरीत मशीन घरी आणतो. मात्र त्याच्याकडे टेप नसतो. तो पांढ-या कपडयाची दोन हात लांब व बोटभर जाडीची नाडो तयार कपांढ-या नाडीवर काळया दो-यानं, चार पाच बोटांच्या अंतरावर एक ( I ) अशी व अशा तीन रेषानंतर चौथी (      ) अशी खूण करुन महादेव गिन्हाइकांची मापे घेतो. हे तेथील लोकांना कायमचे आहे. त्याबद्दल त्यांना काही वाटत नाही.

कौतिकला स्वत: शिक्षण घेता आले नसले तरी ती भीमा-नामाला शाळेत घालते. आपल्या मुलांना शाळा शिकविण्याचो तिची जिद्द आहे. हिंगणघाट मध्ये प्राथमिक शाळा आहे. भीमा तिसरीत नामा तुकडीत शिक्षण

तिथेच घेतो. पुढे कौतिक आपला नवरा महादेवला तिवशाला असलेल्या शाळेत मुलांची नांव टाकायला पाठवते. तेथील शिक्षक महादेवला अगोदरच्या शाळेतला दाखला आणायला सांगतात. शिक्षणाचे महत्व न कळालेला, आगोदरचाच आळशी महादेव शाळा सोडल्याचा दाखला आणायला नकार देतो. त्यामुळे नामा-भीमाचो नांवे परत पहिलीतच रजिस्टरवर नोंद होतात. महादेवला मुलांचो जन्म-तारीख माहीत नाही. तिसरीत शिकत असलेल्या भीमाला तो पुन्हा पहिलीत बसवायला तयार होतो.

पूर्वी खेडेगावात मुलांची जन्मतारीख माहीत नसे. म्हणून शिक्षकच पोरांचे चेहरे, उंची व जाडी पाहून जन्मतारखा ठरवत व बुकात नोंदवत असत यावरुन त्याकाळची शिक्षणाची आवड, परिस्थिती याचो जाणीव होते. " धग " मध्ये ही भीमा-नामाची जन्मतारीख मास्तर ठरवून टाकतात.

शिक्षक लोक कोट घालत होते, निकालाच्या दिवशी सारी मुले शांत बसली होती. शंक-या हेडमास्तरांची नक्कल करीत नव्हता. सर्वाप्रमाणे तोही आपल्या कोप-यातल्या जागेवर गौतम बुंध्दाच्या मूर्तीसारखा ताठ बसला होता. हेडमास्तर नामाच्या हुशारीवर खुश होऊन त्याचे कौतुक करतात. चौथीत नामा शाळेत पहिल्या क्रमांकाने पास होतो. कसार

मास्तर त्याला शाळेची फी माफ करण्याचे व इंग्रजी शाळेतील पुस्तक आपल्या पगाराच्या पैशातून देण्याचे कबूल करतात.

शिक्षणावर प्रेम करणारा नामा कसार मास्तरांची बदली झाल्यामुळे अंथरुन धरतो. विद्यार्थ्यांवर प्रेम करणा-या हाडाच्या शिक्षकाची बदली झाल्यामुळे नामा नाराज होतो. नविन वर्गात बसण्यासाठी त्याच्याकडे बदली झाल्यामुळे नामा नाराज होतो. नविन वर्गात बसण्यासाठी त्याच्याकडे नवी पुस्तक, वहया नसतात, नामाची परिस्थिती नसते. नामाला शाळा सोडणे भाग पडते. गरीब विद्यार्थ्यांविषयीची काही शिष्ट मास्तरांची जी तुच्छतादर्शक दृष्टी असते त्यामुळे अनेक होतकरु, हुशार विद्यार्थ्यांचे अपरमित नुकसान होते तसेच केवळ पुस्तक-वहया नाही म्हणून त्या शिष्ट शिक्षकाने नामाला शाळेच्या बाहेर काढले. " पुस्तकाशिवाय अभ्यास करीन मी सर ! " असे म्हणणा-या नामाला मास्तराचे उत्तर होते. " मोठा आगरकरच लागून गोलायरे तू ! "

एकूणच शिक्षण परिस्थितीचा अंदाज येतो, तो नामच्या शाळा सोडण्याच्या प्रकरणातून, सीता-सुखदेव, कासम-सकीना, बानो, सीता म्हालीण, रघुनाथ शिंपी ही सर्व माणसे निरक्षर आहेत. बारवडया व त्याचा घरजावई, दिवानजी खोटे कागद-करार करतात. " धग " मध्ये शैक्षणिक परिस्थिती ही त्याकाळच्या विदर्भातल्या ग्रामजीवनातील सत्य प्रकट करणारी वास्तवतापूर्ण आहे. आर्थिक परिस्थितीवर शैक्षणिक परिस्थिती अवलंबून होती हेच खरे मानावे लागते

" गावगुंड " आणि " पाणकळा" या कादंब-यात विलक्षण साम्य आहे. ग. ल. ठोकळ यांची १९४६ ची " गावगुंड" ही कादंबरी थोडी रांगडी, थोडी पांढरपेशी आहे. " पाण-कळाचे" दोष टाळून अतिशय आटोपशीर बांध्याची ही कादंबरी ग. ल, ठोकळ यांनी घडविली आहे. १९४० नंतर ग्रामीण साहित्यनिर्मितीस विशेष भरते आले. प्रगल्भ सामाजिक जाणीवे-तून झालेल्या माटे यांच्या कथालेखनामुळे दलितांचे व वन्य जमातींचे जीवन शब्दांकित झाले. याच काळात वामन चोरघडे यांची ग्रामीण कथा घडू लागली होती.

१९५० च्या आसपास मराठी कादंबरीत नवचैतन्य व नवी जाणीव दिसू लागली. " बळी" ( १९५० ) मध्ये विभावरी शिरुरकर यांनी नवीन जाणीव निर्माण केली. विभावरींच्या मनात निर्माण झालेल्या या समाजविषयीच्या अपार जिव्हाळयातून " बळी " चे लेखन झाले आहे. गुन्हेगार म्हणून घोषित झालेल्या मांग गारुडी समाजाचे जीवनचित्रण केले आहे. गुन्हेगारी वृत्ती का निर्माण होते याचा शोध घेण्याचा प्रयत्न विभावरींनी केला आहे.

विभावरी शिरुरकराच्या नंतर मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात ठळकपणे पुढे येणारे नाव म्हणजे श्री.ना. पेंडसे यांच्या " एल्गार" ( १९४९), " हद्दपार" ( १९५० ) " गारंबीचाबापू (" ( १९५२), " हत्या" ( १९५४), " कलंदर" ( १९५९), व " रथचक्र " ( १९६२ ) या कादंबरीवाङ्मयातून आलेल्या अनुभवविश्व प्राधान्याने ग्रामीण व प्रादेशिक होते.

" एल्गार " ही कोकणातल्या साखरपेंडी या खेडयात घडणारी रघू आणि कादर या दोन सुशील जिवांची प्रेमकथा आहे. " गारंबीचाबापू " ही पेंडशांची तिसरी कादंबरी जगावेगळ्या अफाट बापूची जीवनकथा यशस्वीपणे रेखाटली आहे. बापूच्या कर्तत्वाचे चित्रण लोकप्रिय ठरले. परंतु पेंडशांना संपूर्ण ग्रामीण परिसर साकार करता आला नाही. " रथचक्र" मधील जीवनचित्रणाची व्याप्ती कौटुंबिकतेच्या पलीकडे जात नाही. कोकण प्रदेशांतील एक ठराविक पट्टी ही पेंडशांच्या उपयुक्त कादंब-यांतील कथावस्तूंना व तदंतर्गत पात्रांना साकार करणारी रंगभूमी आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांची " पुढच पाऊल " ( १९५0 ) ही पहिली कादंबरी दलित कलावंताची कथा वर्णन करते. " किसना" " मोगरोबाई " नावाच्या बाईच्या नांदात लागतो. व त्याच्या कुटुंबियाची दुर्दशा होते. अशा अवघड स्थितीत किसना स्वत:ला सावरतो आणि तमाशा क्षेत्रात पाय रोवून उभा राहतो. असे कथानक माडगूळकरांनी रंगवले आहे. त्यांच्या त्यांच्या १९५५ सालच्या " बनगरवाडी " एवढी वेगळी होती की, तिची परंपरा दाखवून देणे अवघड व्हावे. निसर्गाच्या परिसरात जीवन जगणा-या मानवसमूहाचे दर्शन " बनगरवाडी"मूळे घडले. " माणदेश" त्वकपणे चित्रित करण्यात माडगूळकरांना यश आले. " बनगरवाडी"चा विचार जुन्या मूल्यांनी करता येत नव्हता.

कारण तेथे नायक-नायिका, खलनायक, कथानक असा प्रकारच नव्हता, बनगरवाडीच्या धनगरांचे समूहजीवनच चित्रण विषय म्हणून केंद्रस्थानी होता. त्यालाच नायकत्व लाभलेले होते. थोडक्यात एकंदर व्यंकटेश माडगूळकरांनी प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. सर्व व्यक्तिरेखा हाडामासाच्या आणि माणदेशाच्या मातीतल्या वाटतात. १९५० ते १९६० हा काळ पेंडसे, दांडेकर-माडगूळकर यांच्या कादंबरीचा आहे.

गो. नी. दांडेकरांच्या कादंबरी लेखनांत एक प्रकारची उक्रांती झालेली आढळते. शालेय जगतासाठी लिहिलेल्या बोध-परायण कथांपासून तो " शितू " सारख्या चिरमधुर प्रेम कथे-पर्यंतचा त्यांच्या कथानिर्मितीचा झालेला विकास खरोखर विलोभनीय आहे. " शितू " मध्ये रसरशीत प्रादेशिकतेचे दर्शन घडविले आहे. शितूच्या विसूवरील प्रेमाची ही दिव्य गाथा प्रादेशिक पार्श्वभुमीवर चित्रिलेली आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली समाजव्यवस्था उद्ध्वस्त होत चाललेली आहे हे पाहून गोपीदा व्यथित होतात. यातूनच " पडघवली " ( १९५५ ) सारखी कादंबरी लिहली जाते. वेगवेगळया अनुभवक्षेत्रांचा शोध आणि त्यांचे प्रभावी सादरीकरण हे प्रादेशिक ग्रामीण वाङ्मयाचे वैशिष्ट्य आहे.

१९५०ते १९६० या काळात पेंडसे-दांडेकर-माडगूळकर याच्या ग्रामीण कादंबरीचे एकूणाच मराठी कादंबरीच्या संदर्भात महत्वाची भर पडली. याच काळात ग्रामीण कादंबरीला प्रादेशिकतेचा स्पर्श

लाभला. जीवनाकडे ती अधिक वेगाने, गांभीर्याने पाहू लागली. सुमारे १९४७ ते १९५० मधील " एल्गार", " क्षी " " बनगरवाडी" " गावगुंड" " पडघवली" व " हद्दपार" या कादंब-यांनी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात स्वतंत्र आणि वैशिष्टपूर्ण स्थान प्राप्त केले. या कलाकृतीचा गौरवपूर्वक उल्लेख करावा लागतो. १९६० पर्यंत नागरजीवनाचे चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी १९६० नंतर जीवनानुभव आविष्कृत करणारी संपन्न व्यापक मानवतावादी बनली.

अशाप्रकारे आपण १८८० ते १९६० पर्यंतचा मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार केला.

समारोप

१." कादंबरी एक वाङ्.मयप्रकार" अभ्यासतांना कादंबरोची संकल्पना , व्याख्या विषयक प्रश्न इ. चर्चा केली. प्रस्तुत प्रकरणा-मध्ये कादंबरोची संकल्पना तसेच कादंबरीचा स्वरुप विचार मांडण्याचा प्रयत्न केला. १८५७ पासूनचा मराठी कादंबरीची वाटचालीच्या पाऊलखुणा अभ्यासल्या. ग्रामीण कादंबरी आणि प्रादेशिक कादंबरी मधील भेद अभ्यासला. अलिकडे मराठी ग्रामीण कादंबरी मध्ये हा प्रश्न अभ्यासकांना भेडसावत आहे. म्हणूनच या प्रश्नासंबंधीच्या मतमतांतरांचा आढावा घेवूनच ग्रामीण कादंबरोच्या पूवपोठिकेकडे वळलो.

२. " धग " पूर्व ग्रामीण कादंबरीची पूर्वपीठिकेमध्ये धनुर्धारी, फुले, भालेराव, ना. वि. कुलकर्णी, वि. स.सुखटणाकर, साने गुरुजी, र.वा. दिघे, ठोकळ, विभावरी शिरुरकर, पेंडसे, दांडेकर, माडगूळकर

विदर्भातल्या पिकाच्या हंगामाच्या वेळची लोकांची गडबड " पहिल्यांदा आमच्याच वावरात चला" अशा विनवण्या यांचे वर्णन येते. नागदिवाळीनंतर आलेल्या सुगीत जोंधळा, तूर, मूग यांच्या काढणीचे आणि मजूरांच्या कमतरतेची फायदा घेवून कौतिकासह इतर मजूर दर वाढवतात. याचे प्रत्ययक्षम चित्र या कादंबरीत येते.

दिवाळी सण मोहरम, पोळा हे सण ग्रामीण लोकजीवनाचा महत्वाचा उत्साहाचा भाग आहे, अशावेळी लोकमने उल्हसित होतात, पोळा सणांचे वर्णन सुदरपध्दतीने शेळकेंनी केले आहे. मुस्लीम सकीना बैलांची पूजा करत नाही. भीमा-बनो प्रकरणात बिकट प्रसंग उभा राहातो. घर सोडायला कासम सांगतो पण तयाला नंतर दया येते. आणि घर सोडून न जाण्याविषयी कासम कौतिकला सांगतो. कौतिकच्या बाळंतपणात सकीना मदत करते. स्त्री ही स्त्रीचे दु:ख जाणते. त्यामध्ये जातीबंधन आडवे येत नाही. कष्टकरी जमातीला जातीपातीचा विचार करीत नाही.

कौतिका तंबाखू खाते आणि महादेव-भीमा विडया फुंकतात. भीमाला तमाशा, सर्कस पाहाण्याचा नाद आहे, जुगार, हे त्याचे व्यसन आहे. स्त्री -पुरुष यांचे जे नाते जीवनात परस्परानुकूल नाते असते. तसे असूनही महादेव मवाळ मनोवृत्तीचा आहे. कौतिक सा-या जीवनसंघर्षात धैर्याने लढते. म्हणून

ग्रामीण जीवनातली " धग " ही एक जीवघेणी " झुंज " आहे. विवाह संस्थेने " लग्न " नांवाच्या गोंडस प्रथेने भिन्न प्रवृत्तीचे स्त्री-पुरुष एकत्र आल्यानंतर जीवनातला त्यांचा सुखीसंसार शोकांतिका ठरतो. सर्वस्वानिशी झगडतांना एकाकी लढणारी कौतिक वेडी बनते. नवरा हेच तिचे मूळ सामर्थ्य होते. पत्नी असूनही ती मातृवात्सल्याने नव-याला सांभाळते. स्त्री ही क्षणाची पत्नी व अनंत काळाची माता असते हेच कौतिकचे " स्त्री मन" मानवाच्या विश्वपातळी-वरीचे व्यापक द्योतक ठरते.

" धग " मध्ये माणसां माणसामधील परस्पर संबंधाने स्वरुप घालून व-हाडातील समाजजीवनाचे दर्शन घडते. विवाह संस्थेच्या दोषाचा एक अस्सल भाग चित्रण झालेला आहे. उदासीन वृत्तीचा महादेव आणि जीवापाड मेहनत करणारी कौतिक या दोन परस्पर विरोधी टोकाच्या स्वभावांच्या व्यक्तींच्या सहजीवनाचे चित्रण लेखकाने मोठ्या कौशल्याने केले आहे.

## श्रध्दा, अश्रध्दा आणि अंधश्रध्दा

ग्रामीण भागात घडणा-या या कथानकात श्रध्दा, अश्रध्दा आणि अंधश्रध्दा यांचे नमुने येत राहातात, महादेव परमेश्वर दाखविल त्या वाटेन जायचे, परमेश्वराची असेल इच्छा तसे जगायेच असा त्याचा श्रध्दा भाव आढळतो. सर्व कांही तो घडवत असतो.

आपण शूद्र आहोत ही त्याची भावना आहे.

कौतिक सुध्दा " हया सर्वा तुहाच फापटपसारा आये,
तारसीन त तारत जा आन् मारसीन
त मारत जा । " असे भक्तीभावाने

शादलबुवाला हात जोडून म्हणते. कौतिक-महादेव कपडे विकण्याचा व्यापार मुहूर्त चांगला ठरवून बाजाराला जाण्याचे ठरवतात. यशोदीला दृष्ट झाली, भूतबाधा झाली म्हणून तिच्यावर उपाय करतात. मुले देव देतो अशी सीता म्हारिण कौतिकला बोलते. कासम आणि सकीना यांचा अल्लावर विश्वास टाकून आपल्या जीवनाचे तो भले करेन अशी श्रध्दा आहे. गाईचे शेपूट धरुन शपथ घ्या असे कौतिक बाखडयाच्या दिवाणजीला सांगते. एकंदर कौतिक, महादेव, सकीना, कासम, सीता, सुखदेव, यांच्यावर अंधश्रध्दाचा पगडा आहे.

प्रदेश मागासलेला असल्याने, शिक्षणाचा गंध नसल्याने साहाजिकपणे लोकही मागासलेले आहेत. लोकांच्या जीवनात अंधश्रध्दा निर्माण झालेल्या आहेत. परंपरागत जीवन जगण्यातच त्यांना धन्यता वाटते.

सुखदेव-सीता, कासम -सकीना यांचे कौतिकच्या कुटूंबाशी शेजार धर्माला अनुसरुन वागणे आढळते. या सर्व माणसांच जगण्यावर विलक्षण प्रेम आहे. त्यामुळेच ते येणाऱ्या समस्यांना व संघर्षाला सामोरे जातात.

विदर्भातल्या समृध्द मातीमधल्या पिकांच्या श्रीमंतीचे वर्णन शेती असणा-या शेतक-यांचे समृध्द जीवन चित्रित करते. रोख पैशाच्या अभावामुळे जीवनावश्यक परस्पर व्यवहार ही वस्तुंची देवाणघेवाण होत होती. कौतिक अशी वस्तुची देवाणघेवाण करत असलेले चित्रण झालेले आहे. तळेगांवात फारशी ओळख नसतांना कौतिकच्या कुटुंबाशी चहा-जेवणाची सोय करणारे लोक फार श्रीमंत नसतात, पण त्यांच्या त्या सहजगत्या साध्या प्रसंगातून प्रादेशिक दिलदारपणा प्रकट होतो.

वर्धा, अमरावती या विदर्भातल्या प्रादेशिक पट्टयाचे जीवन चित्रण येथे दिसते. ग्रामजीवनातील समजुती, लोकमत, यांचे चित्रण सुटे न राहाता ते जीवनानुभवाचा भाग म्हणूनच येते. कासम महादेवच्या जत्रेला जातो. मारुतीच्या पारावरच्या भजनात कासमला गावकरी भजन गाण्याचा पहिला मान देतात.

नवरा- बायको, सासरा-सून, मेहूणा-जावई, पिता-पुत्र यांचे संबंध सुध्दा समाज सापेक्ष असतात. फक्त संदर्भ भिन्न असतात. प्रवृत्ती इथून तिथून सारख्याच असतात. भीमा-बानो अतिप्रसंग केठेही घडू शकतो. शेजारी धर्माला जागणारी सती-सुखदेव आणि सकीना-कासम ही कुटूंब कुठेही भेटतात, लोकमन दैववादी, श्रध्दाशील आहे, गोरगरिबांना लुबाडणारे बारवडया, घरजावई आहेत. ते फसवाफसवी लुबाडणुक करतात. हातावर पोट भरणा-या भुमिहीन लोकांची धनदांडगे लोकाकडून होणारी

पिळवणूक प्रखरपणे स्पष्ट झाली नसली तरी ती वास्तव-पातळीवर आवश्यक तितकी प्रेकट झाली आहे.

बदलत्या नव्या पिढीचे प्रतिनिधीत्व भीमा या व्यक्तिरेखेत चित्रित झालेले आहे. परंपरेने आलेला शिंपी व्यवसाय सोडून भीमा हमाली करणे, वेटर म्हणून हॉटेल-मध्ये काम करणे, चो-या करणे सुरु करतो. तो अमरावतीत चंपी, केस कापण्याचा न्हाव्याचा धंदा करतो. परंपरेने आलेला व्यवसाय सोडून त्याने दुसरा व्यवसाय स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकांनी बदलत्या समाज व्यवस्थेचे ग्रामीण जीवनात बदलणा-या जीवनमूल्यांचे चित्रण " धग " मध्ये आविष्कृत केले आहे.

## समारोप

" धग " ही कादंबरी अस्सल ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवते. प्रस्तुत कादंबरीचा विषय विदर्भातल्या शिंपी कुटुंबातील कौतिकच्या संसाराच्या जीवनकहाणीचा आहे. या कुटुंबाच्या पोटासाठी चालेल्या चिवटपणाची झुंज, त्यांची भटकंती विषमता-जीवनाच्या आर्थिकतेशी निगडीत आहे. कौतिकच्या धडपडणा-या कुटुंबाचा संबंध हिंगणघाट, तळेगांव मोझरी या गांवाशी येतो. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे अनेक संदर्भ येतात.

ग्रामीण भागातील जातीव्यवस्था, धार्मिक भावना, शाळांची अवस्था, मोलमजुरांचे जीवन, गरिबलोकांची पिळवूणक इ. अनेक संदर्भ अत्यंत वास्तव पातळीवर येतात. या कादंबरीतील अनुभवविश्व कसे ग्रामीण संस्कृतीचा अपरिहार्य घटक आहे हे स्पष्ट करतांना म. सु. पाटील लिहितात, "....हा अनुभव जणू या लेखकाच्या मनोभूमीत रूजून वाढतविकसत जात असल्याचा प्रत्यय येतो. त्याच्या अविष्कारात लेखकाची जाणीवनिष्ठा अखेरपर्यंत टिकून राहिल्याचे जाणवते. ग्रामीण कादंबरीच्या बाबतीत असा अनुभव यापूर्वी फारसा येत नव्हता. तो या कादंबरीने प्रथम दिला. " पाचोळा " सारखी या प्रकारातील लक्षणीय कादंबरी " धग " च्या पावलावर पाऊल ठेवून आकाराला आलेली दिसते. या दृष्टीने " धग " ही एक वळणावरची कादंबरी म्हणावी लागेल "[३]

प्रादेशिकतेचे रंग ग्रामीण जीवनदर्शनाचा भाग बनतो. श्रध्दा, अंधश्रध्दा आणि रूढी प्रस्तुत कादंबरीत अपरिहार्य भाग म्हणून येतात. " धग " मधील चित्रित झालेले समाजीवन वास्तवाला भिडणारे आहे. त्या काळच्या स्त्री-पुरुषांची व्यक्तिमत्वे, त्यांचे प्रकृती-प्रवृत्ती समाजाची सामाजिक, आर्थिक शैक्षणिक, स्थिती-गती आपण अभ्यासली.

" धग " ही कादंबरी विदर्भाच्या प्रादेशिक परिसरात घडते, त्याचे शेळके यांनी यथातथ्यपणे चित्रण केलेले आहे. यापुढील प्रकरणात " धग " मधील प्रादेशिकता अभ्यासू.

## प्रकरण दुसरे

### संदर्भ-सूची


१. देशपांडे कुसमावती. - "पासंग" मौज प्रकाशन गृह
मुंबई, चौथी आवृत्ती, एप्रिल,१९८७
पृ. क्र. ७७

२. लमेन एच. ए. - " मराठी साहित्यातील स्पंदने"
( कुलकर्णी गो. म. )
सुपर्ण प्रकाशन पुणे. आवृत्ती पहिली
१९८५. पृ. क्र. ७ वरुन उद्धृत

३. पाटील म. सु. - प्रतिष्ठान, कादंबरी समीक्षा विशेषांक
जाने. १९८१, पृ.क्र. ४४